# जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव

**सभा क्र. २०** **// स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त //** **दिनांक : २२/११/२०१९**

जळगांव शहर महानगरपालिकेत दि.**२२/११/२०१९ शुक्रवार** रोजी सकाळी ११.०० वाजता जळगांव शहर महानगरपालिकेच्या सरदार वल्लभभाई पटेल टॉवर प्रशासकीय इमारतीमधील २ ऱ्या मजल्यावरील सभागृहात स्थायी समिती सभापती ॲड. हाडा शुचिता अतुलसिंह यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त.

उपस्थिती नोंदणी रजिष्टरमध्ये स्वाक्षरी करुन खालील मा.सदस्य सभेस उपस्थित होते.

**मा.ॲड. हाडा शुचिता अतुलसिंह सभापती तथा पिठासीन अधिकारी**

| | |
|---|---|
| श्री.ढेकळे सदाशिव गणपत | श्री. दारकुंडे नवनाथ विश्वनाथ |
| श्री.पोकळे दिलिप बबनराव | श्री.पाटील राजेंद्र झिपरु |
| श्री.खडके सुनिल वामनराव | सौ.देशमुख प्रतिभा गजानन |
| श्री. कोल्हे प्रविण रामदास | सौ.काळे रेश्मा कुंदन |
| श्री.सनकत चेतन गणेश | श्री.भंगाळे विष्णु रामदास |
| श्री.सोनवणे मुकुंदा भागवत | शेख सैईदा युसुफ |

सदर सभेस, मा.उपायुक्त. श्री. अजीत मुठे, मा.उपायुक्त. श्री. मिनानाथ दंडवते, मा.उपायुक्त . उत्कर्ष गुटे .मुख्यलेखा परिक्षक श्री.संतोष वाहुळे, मुख्यलेखाधिकारी . कपील पवार , नगरसचिव श्री.सुनिल गोराणे उपस्थित होते.

**वंदे मातरमने सभेची सुरुवात झाली.**

मा.सभापती :- नगरसचिव यांनी सभेच्या कामकाजास सुरुवात करावी.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** आपल्या महापालिकेमध्ये नव्याने नियुक्त झालेले कॅफो साहेब कपील पवार म्हणुन आहेत . मी ऐकलं आहे की त्यांचा स्वभाव वगैरे चांगला आहे. चांगल काम आहे. त्यांच जळगांव महापालिके मध्ये अभिनंदन करतो, आणि ठराव करून घेण्यात यावा.

**नगरसचिव :- विषय क्र. १** पाणी पुरवठा विभाग अंतर्गत वाघुर पाणी पुरवठा योजने अंतर्गत टाकण्यांत आलेल्या मुख्य जलवाहीनी १५०० मीमी ते ६०० मीमी पीएससी व ११६८ ते ४५७ मीमी एमएस पाईप लाईनची व्यवस्था व दुरुस्ती करणे कामी वार्षिक मंजुर मक्तेदार यांचेकडून मंजुर दरात काम करून घेणेस व जादा रक्कम रु.१० लक्ष मात्र चे खर्चास मान्यता मिळणे कामी प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.राजेंद्र पाटील :-** सभापती महोदय, उपायुक्त साहेब आवश्यक बाब म्हणुन आपण हे मंजुर केले पाहीजे ,परंतु आजपर्यंत रामेश्वर कॉलनी परिसरामध्ये हॉटेल कस्तुरी ते मेहरूण स्मशान भुमि या दरम्यान कायम व वारंवार आपली जी पाईपलाईन आहे मोठी पाईपलाईन ती फुटत असते आणि महापालिकेने आतापर्यंत त्यावरती बराच खर्च केलेला आहे. कदाचित आपण ती पाईपलाईन बदलविली असती तर जो खर्च झालेला आहे . त्यापेक्षा कमी खर्च ही जर आपण पाईपलाईन टाकली असती तर आपल्याला कमी खर्च आला असता, आणि आपण आजही तेच करतोय. मागे मी नगरसेवक नसतांना लोकमत वर्तमान पत्राने लोकमत आपल्या दारी, महापालिकेच्या संयुक्त विद्यमानाने हा कार्यक्रम घेतला होता ३-४ वर्षापुर्वी त्या कार्यक्रमामध्ये मी हा विषय मांडला होता. हॉटेल कस्तुरी ते मेहरुण स्मशान भुमि यातील सर्व पाईपलाईन वारंवार फुटत असते. आपण तिला रिपेअर न करता गॅलेनेज ची जर पाईपलाईन टाकली तर हा प्रश्न कायमचा सुटेल. आणि १५ दिवसातनं , आठवड्यातनं , महिन्यातनं आपलं जे कस्तुरी ते स्मशान भुमिचा जो रोड आहे तो कायम खोदला जातो. त्या रोडवरुन एम.आय.डी.सी. मध्ये जाणाऱ्या कामगारांची खुप मोठी संख्या आहे. त्यामुळे त्यांना ही खुप त्रास होतं जाण्याकरीता नागरीकांना . तर आपण अमृतच्या माध्यमातुन जर का ती होत असेल. आवश्यकता असेल इतके खर्चाची तर करावी.

**श्री.डी.एस.खडके :-** अमृतच्या कामाला सुरूवात केलेली आहे कस्तुरी पासुन ते मेहरूण पर्यंत नागरीकांचे बांधकाम सुरू होते त्यामुळे ती पाईपलाईन राहीली आहे त्या अनुषगांने गिरणा टाकीपासुन ते मेहरूण पावेतो काम झालेल आहे अमृत च्या माध्यामातुन आणि ते संपुर्ण काम सहा महिन्यात पुर्ण होणार आहे

**श्री.राजेंद्र पाटील :-** सहा महिन्यात होईल .

**श्री.डी.एस.खडके :-** होय .

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** खडके साहेब , अध्यक्ष महोदय, याच्यावरुन विषय सांगतो, काव्यरत्नावली चौक चर्च जवळ व मेहरुण शिवार तेथे चोक अप निघतच राहता रोड फोडतच राहतात ते का हमेशा होतात ?

**श्री.डी.एस.खडके :-** सगळयात मेन आपला काव्यरत्नावली चौक ते गिरणा टाकी रोड, त्या १२ मिटर रोडला ८ ते ९ पाईपलाईन आहे. प्रत्येक ठिकाणी आता वाघुरची पण पाईपलाईन आहे. दुसऱ्या पण पाईपलाईन आहेत , नंतर` त्या ठिकाणाहुन रेतीच्या पण गाडया वाहतात त्याच्यामुळे तेथे पाईपलाईन फुटल्याचा प्रॉब्लेम येतो .

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** नाही दर टाईमाला कस काय होतं हे .

**श्री.डी.एस.खडके :-** कुठला

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** हा प्रॉब्लेम तिन जे स्पॉट आहेत हे.

**श्री.डी.एस.खडके :-** नाही नाही दर वेळेला नाही , पाईपलाईन दुरूस्ती साठी आपण खोदलेले असते व ते आले असल्याने आपण दोन दिवस तसेच ठेवतो मग सुकले की नंतर बुजवतो.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** मागच्या मिटींगमध्ये ही बोललो होतो. राजु भाईंनी जो विषय मांडला तोच विषय आहे. आमच्याकडे जी टाकायची आहे पाईपलाईन तेथे ५-६ पाईप टाकणे आणि पुढे पाईप टाकुन ठेवणे आणि पुढे जाणे येणेला सुध्दा अडथळा येतो.अमृतची जी पाईप आहे. त्याच्यामुळे अतिक्रमण आणि पाईप पडलेले आहे. तेथे लोकांना वापरताच येत नाही . अनेक पाईप पडलेले आहे. ते केव्हा टाकले जातील.

**श्री.डी.एस.खडके :-** काल मिटींग झाली अमृतच्या संदर्भात त्याचे विषयी आपण पत्र दिलेले आहे परंतु त्यांचे पत्र अजुन आले ले नाहीये तरी माझे बोलणे झालेले आहे त्या अनुषंगाने त्याने काही ठिकाणी काम सुरू केलेले आहे. येत्या सोमवार पर्यंत ते पाईप बाजुला केले जातील . आपण जर पाहिले की ईतर ठिकाणी हिच परिस्थिती आहे. या भागामध्ये काही ठिकाणी स्टॉक केलेले आहे जमीनीवर काही टाकलेले आहेत.आणि त्याचं काम दिवाळी पासुन जवळपास एक महिन्यापासुन बंद स्थितीत होत. माझी साहेबांशी चर्चा झाली तर ते सोमवार पासुन त्याचं काम सुरू होईल.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** जर सोमवार पासुन सुरु नाही झाल. तर कमीत कमी ते उचलुन तरी न्या तेथुन. कारण लोकांना वापरायला जागा नाही. ॲक्सीडेंट होत आहेत.

**मा.सभापती :-** याकडे प्रशासनाने लक्ष द्यावे. यात काय झालेलं आहे याचं प्रशासनाने शोध घ्यावा. हा खर्च इतकं करत आहे आपण यापेक्षा नविन पाईपलाईन टाकले हे चांगलं ठरणार आहे. याच्यात कारण शोधा आणि योग्य कार्यवाही तातडीने करा.

**श्री.राजेंद्र पाटील :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य आहे .

**श्री. नवनाथ दारकुंडे :-** प्रस्तावास माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. १७८ पारित करण्यात आला.**

**असा ठराव करणेत येत आहे की**, पाणी पुरवठा योजने अंतर्गत टाकण्यात आलेल्या वाघुर पाणी पुरवठा मुख्य जलवाहीनी १५०० मीमी ते ६०० मीमी पीएससी व ११६८ ते ४५७ मीमी एमएस पाईप लाईनची व्यवस्था व दुरुस्ती करणे कामी मक्तेदार श्री.संजय दिनेश भोळे, जळगांव यांचे स्थायी समिती ठराव क्रं.७५६ दि.१५/१२/२०१७ अन्वये दर मंजुर करण्यात आलेले आहेत. तसेच आजमितीस पुढील दुरुस्ती कामाकरीता विविध व्यासाचे १२ नग पाईप शिल्लक आहेत. त्यामुळे अस्तित्वास असलेल्या पाईपाव्दारे भविष्यात पाईप लाईन गळती झाल्यास ती दुरुस्त करता येईल, मात्र पाईन लाईन दुरुस्तीच्या वेळेस डिवॉटरींग करणे, वेल्डींग करणे, पाईपाचा जॉईंट दुरुस्त करणे इत्यादी कामावर खर्च करावा लागेल. त्यामुळे फक्त मजुरी मक्त्याचे काम भविष्यात होण्याची शक्यता जास्त आहे. सदर कामाचे स्वतंत्र निविदा काढल्यास पुर्वीच्या निविदेस मिळालेला प्रतिसाद पाहता निविदा प्रसिध्दीस प्रतिसाद मिळेल याची शक्यता कमी वाटते. तसेच निविदा प्रसिध्दीस निविदा मंजुरीचा कालावधी विचारात घेता सध्याचे मक्तेदार श्री.संजय दिनेश भोळे, जळगांव यांना दि.१८/१२/२०१९ पर्यंत मुदतवाढ असल्याने भविष्यातील दुरुस्तीचे काम त्यांच्या मार्फत करुन घेणेस व भविष्यातील दुरुस्तीचे कामास वाढीव खर्च होण्याची शक्यता असल्याने या कामी येणारा रक्कम रु.१० लक्ष मात्र वाढीव खर्चास पाणी पुरवठा व्यवस्था व दुरुस्ती या लेखाशिर्षका खालील तरतुदीतून करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने नियमानुसार शासन आदेश/निर्देशानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १३ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- पाटील राजेंद्र झिपरु**

**अनुमोदक :- दारकुंडे नवनाथ विश्वनाथ**

**नगरसचिव:- विषय क्र. २)** GeM पोर्टलवरुन ३ नग Electronic Weigh Bridge Without Civil Work (४० टन क्षमतेचे) खरेदी करणेचे कामी सर्वात कमीचे दर रक्कम रु.२७,७५,०००/- प्राप्त L१ निविदाधारक Mahindra Scales यांना कार्यादेश (Work Order) देणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.चेतन सनकत :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य आहे.

**श्री.प्रविण कोल्हे :-** अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. १७९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, GeM पोर्टलवरुन ३ नग Electronic Weigh Bridge Without Civil Work (४० टन क्षमतेचे) खरेदी करणे कामी विहित मुदतीत प्राप्त झालेल्या २ Online bid निविदा धारकांचे ई-निविदा समितीपुढे Technical bid छाननी अंती १) Mahindra Scales २) Shree Venkateswara Scales प्रथम दर्शनी पात्र ठरत असल्याने ई-निविदा समिती तसेच आयुक्त यांचे दि.१५/१०/२०१९ च्या मान्यतेने Financial bid आर्थिक (लिफाफा क्रं.२) उघडले असता प्राप्त दरांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | संख्या | Mahindra Scales | Shree Venkateswara Scales |
|---|---|---|---|---|
| | | | L१ | L२ |
| १. | GeM पोर्टलवर ३ नग Electronic Weigh Bridge Without Civil Work (४० टन क्षमतेचे) खरेदी करणे बाबत | ३ नग | २७,७५,०००/- | २८,३५,०००/- |
| | एकूण - | | २७,७५,०००/- | २८,३५,०००/- |

तुलनात्मक तक्ता पाहता प्राप्त झालेल्या L१ निविदाकार Mahindra Scales यांचे सर्वात कमीचे न्युनतम दर रक्कम रु.९,२५,०००/- प्रती नग प्रमाणे आयुक्त यांचे दि.०१/११/२०१९ च्या मान्यतेनुसार तुर्त २ नग तातडीने खरेदी करण्यास येणारा खर्च रक्कम रु.१८,५०,०००/- मात्र १४ व्या वित्त आयोगाच्या प्राप्त निधीतून करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने नियमानुसार शासन आदेश/निर्देशानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १३ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- सनकत चेतन गणेश**

**अनुमोदक :- कोल्हे प्रविण रामदास**

**नगरसचिव:- विषय क्र. ३)** महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सुविधांचा विकास कार्यक्रम अंतर्गत शासनाने वितरित केलेल्या ५ कोटी अनुदाना अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत प्रभाग क्रं.०२ मध्ये आवश्यक ठिकाणी रोड क्रॉसिंग स्लॅब कल्व्हर्ट बांधणे व ४ ठिकाणी बोअरवेल करणे व प्रभाग क्रं.०२ मधील कांचन नगर, कांलकामाता मंदिरा जवळील मनपाची आरक्षित जागा विकसीत करणे व वॉचमन रुम बांधणे कामी रक्कम रु.३२,७४,८३६/- मात्र चे खर्चास मान्यता मिळणे कामी प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य आहे.

**श्री.दिलीप पोकळे :-** माझे अनुमोदन आहे.

**श्री.विष्णु भंगाळे :-** अध्यक्ष महोदया, प्रभाग क्र.२ मध्ये जे बोअरवेलची आपण मंजुरी देत आहे. त्याच्या मागील काळामध्ये तसेच गांधी नगरमध्ये आणि साईबाबा मंदिर एरिया जवळची जी बोअर आहे. या बोअरतील पाणी काही प्रमाणात खाली गेले आहे. तेथे पाईपांच्या बाबतीत होतं. मागच्या ज्या समस्या मांडलेल्या आहे.तरी माझी एक विनंती की, जी दुरुस्ती असेल त्याच्यावर ही आपण लक्ष द्यावे. जेणे करुन पुढच्या काळात सुध्दा ते लोकांना उपलब्ध करता येईल.

**मा.सभापती :-** सन्मा.सदस्य विष्णु भाऊंनी ज्या समस्या मांडलेल्या आहे त्यात तातडीने लक्ष घालुन त्याचा रिपोर्ट त्यांना द्यावा आणि काही अडचण असेल तर तसं लक्षात आणुन द्याव.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. १८० पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सुविधांचा विकास कार्यक्रम अंतर्गत शासनाने वितरित केलेल्या ५ कोटी अनुदाना अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत प्रभाग क्रं.०२ मध्ये आवश्यक ठिकाणी रोड क्रॉसिंग स्लॅब कल्व्हर्ट बांधणे व ४ ठिकाणी बोअरवेल करणे व प्रभाग क्रं.०२ मधील कांचन नगर, कांलकामाता मंदिरा जवळील मनपाची आरक्षित जागा विकसीत करणे व वॉचमन रुम बांधणे कामास महासभा ठराव क्रं.५९ दि.०७/१२/२०१८ अन्वये उक्त निधी अंतर्गत करण्यास मान्यता देवून जिल्हाधिकारी जळगांव यांचे कडेस प्रशासकीय मान्यते करीता शिफारस होणेकरीता मान्यता देण्यात आलेली आहे, त्यानुसार जिल्हाधिकारी, जळगांव यांचे कडेस प्रस्ताव सादर करण्यात आला, त्यानुसार जिल्हाधिकारी, जळगांव यांचे मार्फत विभागीय आयुक्त, नाशिक यांचे कडेस प्रस्ताव सादर करण्यात आला. सदर प्रस्तावास महाराष्ट्र शासन यांचे कडेस प्रशासकीय मान्यतेकरीता शिफारस देवून उक्त प्रस्ताव विभागीय आयुक्त, नाशिक यांचे मार्फत प्रस्ताव सादर करण्यात आला, त्यानुसार सदर प्रस्तावास महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचे कडील शासन निर्णय क्रमांक- संकीर्ण-२०१८/प्र.क्रं. १७० अ (२७)/नवि-१६, मंत्रालय, मुंबई दि. २८/०२/२०१९ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. त्यानुसार आयुक्त मनपा यांचे दि.०२/०३/२०१९ च्या मान्यते अन्वये उक्त कामाची ई निविदा सुचना क्रं.१३०० सन २०१८-१९ मनपा च्या संकेत स्थळ www.jcmc.gov.in वर प्रसिध्द करण्यात आली त्यानुसार दिलेल्या मुदतीत मक्तेदार प्रविण काशिनाथ राणे यांचे दर इतर मक्तेदारापेक्षा कामाचे निविदा रक्कमेपेक्षा ७.६५% कमीचे दर सर्वात कमी आलेले आहे. सदरचे दर १% परफॉर्मन्स सिक्युरिटी चा डी.डी.क्रं.६३०९८१ दि.२५/०३/२०१९ चा रक्कम रु.३३,०००/- मात्रचा डी.डी.स्कॅन करुन निविदे सोबत सादर केलेला आहे. त्यानुसार मक्तेदार यांचे निविदा रक्कमेपेक्षा ७.६५% कमीचे आलेले दरास स्थायी समिती ठराव क्र.१२७ दि.०६/०७/२०१९ अन्वये मान्यता प्रदान केलेली आहे. त्यानुसार मक्तेदार यांनी निविदे सोबत सादर केलेला १% परफॉर्मन्स सिक्युरिटी चा डी.डी.क्रं.६३०९८१ दि.२५/०३/२०१९ चा रक्कम रु.३३,०००/- मात्रचा मुळ डी.डी. पत्र मिळाल्याच्या तारेखपासुन ५ दिवसाच्या आत सादर करण्यास तसेच करारनामा करण्यास पत्रान्वये कळविण्यात आलेले होते परंतू मक्तेदार यांनी उक्त पत्रानुसार दिलेल्या मुदतीत निविदे सोबत सादर केलेला मुळ डी.डी. अदयाप पावेतो निविदा अटी शर्ती नुसार मनपा खजिन्यात जमा केलेला नाही. त्यामुळे मक्तेदार यांना पत्र क्र.जशमनपा/सा.बा./३९५ दि.२९/०७/२०१९ अन्वये सदरचा डी.डी.पत्र मिळाल्या पासुन ०३ दिवसाच्या आत मनपा खजिन्यात जमा करण्या संदर्भात व तसे न केल्यास आपण निविदा सादर करतेवेळी ऑनलाईन भरलेली निविदा अनामत रक्कम रु.३२,७४८/- मात्र जप्त करण्यात येईल असे कळविण्यात आले होते परंतु मक्तेदार यांनी दिलेल्या मुदतीत मुळ डी.डी.सादर केलेला नाही. त्यामुळे मक्तेदार प्रविण काशिनाथ राणे यांनी निविदा सादर करतेवेळी ऑनलाईन पावती क्र.२४२२४ दि.०३/०४/२०१९ रोजी भरलेली निविदा अनामत रक्कम रु.३२,७४८/- मात्र जप्त करण्यास व उक्त कामाची फेर ई निविदा स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यास व येणाऱ्या पर्यायी खर्चास आयुक्त मनपा यांचे दि.२०/०८/२०१९ च्या मान्यते अन्वये उक्त कामाची ई निविदा सुचना क्रं.१४१८ सन २०१९-२० मनपा च्या संकेत स्थळ www.jcmc.gov.in वर प्रसिध्द करण्यात आली अशी ई-निविदा सुचना दै.पुण्यनगरी या वर्तमान पत्रात दि.२३/०८/२०१९ रोजी प्रसिध्द केल्यानुसार दिलेल्या मुदतीत ०२ ई – निविदा सदर संकेतस्थळावर प्राप्त झालेल्या आहेत. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र.सीएटी – २०१७/प्र.क्र.८/इमा-२ दि.२९/०१/२०१९ अन्वये प्रथम मागणीवेळी दोनच पात्र निविदा पात्र झाल्यास नियमानुसार कार्यवाही करावी असे सुचित आहे. त्यानुसार सदर कामाचे दुसऱ्या वेळेस आलेल्या मक्तेदार यांनीदिलेल्या ई-निविदा दरांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे,

| अ.क्रं. | निविदा धारकाचे नांव | निविदा रक्कम रु. ३२,७४,८३६/- | अपेक्षीत खर्च |
|---|---|---|---|
| १ | डि.एच.पाटील कंन्स्ट्रक्शन प्रोपा.विशाल दगडू पाटील | निविदा रक्कमेइतकेच | ३२,७४,८३६/- |
| २ | श्री गजाजन एन्टरप्राईजेस | निविदा रक्कमेवर २.५% जास्तीचे दराने | ३३,५६,७०७/- |

तुलनात्मक तक्ता पाहता मक्तेदार डि.एच.पाटील कंन्स्ट्रक्शन यांचे दर इतर मक्तेदारापेक्षा कामाचे निविदा रक्कमेइतकेचेच दर सर्वात कमी आलेले आहे. त्यानुसार सदर कामी रक्कम रु.३२,७४,८३६/- मात्र इतका मुलभुत सोई सुविधांचा विकास कार्यक्रमा अंतर्गत ५ कोटी निधीतुन खर्च करणेस व मक्तेदार डि.एच.पाटील कंन्स्ट्रक्शन यांचे निविदा रक्कमेइतकेचेच कमीचे दर स्विकृत करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने नियमानुसार शासन आदेश/निर्देशानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १३ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- दारकुंडे नवनाथ विश्वनाथ**

**अनुमोदक :- पोकळे दिलीप बबनराव**

**नगरसचिव:- विषय क्र. ४)** जळगांव शहर महानगरपालिका हददीत व हददीबाहेर दि.२९/०४/२०१९ ते दि.०५/०५/२०१९, दि.०६/०५/२०१९ ते दि.१२/०५/२०१९, दि.१३/०५/२०१९ ते दि.१९/०५/२०१९, दि.२०/०५/२०१९ ते दि.२६/०५/२०१९, दि.२७/०५/२०१९ ते दि.०२/०६/२०१९, दि.०३/०६/२०१९ ते दि.०९/०६/२०१९, दि.१०/०६/२०१९ ते दि.१६/०६/२०१९, दि.१७/०६/२०१९ ते दि.२३/०६/२०१९ व दि.२४/०६/२०१९ ते दि.३०/०६/२०१९ या कालावधीत लागलेल्या आगीबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २८९ अन्वये अग्निशमन विभागाकडील अहवालाची माहिती घेणे.

**सौ.काळे रेश्मा :-** अहवालाची माहिती घेतली .

**सौ.देशमुख प्रतिभा :-** अनुमोदन आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** अग्निशमन दलाची माहिती घ्यायची आहे थोडी , तुमच्या कडे कर्मचारी किती आहेत , लिपीक किती आहेत , शिपाई किती आहेत.

**अग्निशमन अधिकारी :-** कर्मचारी यात वाहन चालक , वगैरे धरून एकूण ५६ कर्मचारी आहेत . लिपीक वगैरे नाहीत.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** लिपीक नाहीयेत .

**अग्निशमन अधिकारी :-** नाही लिपीक नाहीत.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** साहेब त्या ठिकाणी कोणीही लिपीक पदाचे काम करीत नाहीत, तुम्ही जे १४ लोक लिपीक त्याच्यातुन तपासणी करून ते लिपीक ईकडे घेण्यात यावे. जे कामाचे लोक तुम्ही काढुन टाकले आहेत आता १४ लोक हयांना तिकडे दया व ते लोक तिकडे काम करीत नाहीत ते लोक ईकडे घेण्यात यावे. माझ्या माहितीनुसार तुम्ही ते तपास करून करा.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. १८१ पारित करण्यात आला.**

जळगांव शहर महानगरपालिका हददीत व हददीबाहेर दि.२९/०४/२०१९ ते दि.०५/०५/२०१९, दि.०६/०५/२०१९ ते दि.१२/०५/२०१९, दि.१३/०५/२०१९ ते दि.१९/०५/२०१९, दि.२०/०५/२०१९ ते दि.२६/०५/२०१९, दि.२७/०५/२०१९ ते दि.०२/०६/२०१९, दि.०३/०६/२०१९ ते दि.०९/०६/२०१९, दि.१०/०६/२०१९ ते दि.१६/०६/२०१९, दि.१७/०६/२०१९ ते दि.२३/०६/२०१९ व दि.२४/०६/२०१९ ते दि.३०/०६/२०१९ या कालावधीत लागलेल्या आगीबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २८९ अन्वये अग्निशमन विभागाकडील अहवालाची माहिती घेणे.

असा ठराव करणेत येत आहे की, जळगांव शहर महानगरपालिका हददीत व हददीबाहेर दि.२९/०४/२०१९ ते दि.०५/०५/२०१९, दि.०६/०५/२०१९ ते दि.१२/०५/२०१९, दि.१३/०५/२०१९ ते दि.१९/०५/२०१९, दि.२०/०५/२०१९ ते दि.२६/०५/२०१९, दि.२७/०५/२०१९ ते दि.०२/०६/२०१९, दि.०३/०६/२०१९ ते दि.०९/०६/२०१९, दि.१०/०६/२०१९ ते दि.१६/०६/२०१९, दि.१७/०६/२०१९ ते दि.२३/०६/२०१९ व दि.२४/०६/२०१९ ते दि.३०/०६/२०१९ या कालावधीत लागलेल्या आगीबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २८९ अन्वये अग्निशमन विभागाकडील अहवालाची माहिती घेतली.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १३ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- काळे रेश्मा कुंदन**

**अनुमोदक :- देशमुख प्रतिभा गजानन**

**नगरसचिव:- विषय जादा क्र. १)** स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) सन २०१९-२० अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत वार्ड क्रं.१४ तांबापुरा खदानिजवळ ६० सिटस सार्व.शौचालय बांधणे कामी मक्तेदार प्रविण काशिनाथ राणे यांचे निविदा रक्कमेपेक्षा ०.१०% कमीचे दर स्विकृत करुन रक्कम रु.५३,०२,२६२/- मात्र चे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य आहे. आणि प्रशासनाला एक सांगु ईच्छितो असे टेंडर चार महिन्यापुर्वी काढलेले होते. आज त्या प्रस्तावाला मान्यता मिळतेय हे योग्य नाही. कामाला एक महिना महिना उशिर होतो हे योग्य नाही , आपण स्वच्छ भारत अभियांन अंतर्गत या कामातील जे कामे आले होते त्याच्यातीलच हे काम आहे. बाकीच्या कामांचे वर्क ऑर्डर निघाल्या कामे सुरू झालेली आहे. फक्त हे थांबवणे मी हे सभापती साहेबांच खुप खुप आभार मानतो की त्यांनी हया

प्रकरणाचा पाठपुरावा केला , महापौरांनी सुध्दा केला मी केला. म्हणुन हे प्रकरण ईथपर्यंत पाहोचलं नाहीतर पोहोचलं नसतं. त्याची ईतकी वाईट परिस्थिती आहे त्या सार्वजनिक शौचालयांची की एखादया दिवशी पडुन जाईल ते फार जिर्ण झाले आहे. असे झाले असते तर आपणचं जबाबदार राहीलो असतो महापालिका धन्यवाद.

**श्री. राजेंद्र पाटील :-** माझे अनुमोदन आहे.

**श्री.विष्णु भंगाळे :-** अध्यक्ष महोदया , उपायुक्त साहेब आणि संपुर्ण सभागृह जसे साहेबांनी सांगीतलं की पाठपुरावा हा असला पाहीजे. माझ्या वॉर्डामध्ये म्हणजे शाहु नगर कडे जाणारा जो रोड आहे. त्या ठिकाणी गटारीचं काम जवळ जवळ दोन वर्षापासुन सुरू आहे. याकडेही मी आपल्या सगळयांच लक्ष वेधु ईच्छितो की पुढील गटार काम का होत नाहीये. गटार अपुर्ण सोडलेली आहे गटारीचे खोदकाम मागील काही काळामध्ये केलं परत सोडुन दिलं.तर याच कारण काय आणि यांना कधी पासुन टेंडर दिलेले केव्हा पासुन आहे आणि काम पुर्ण करण्याची जबाबदारी कधी पर्यंत आहे. याची माहिती मिळावी.

**शहर अभियंता :-** सभापती महोदय, बोरोलेंच्या घरापासुन ते जळकी मिल पर्यंत हा एक भाग आणि जळकी मिल पासुन ते पिंप्राळा गेट हा दुसरा भाग असे दोन त्याचे इस्टीमेट होते. एका मक्तेदाराने एक घेतले आहे आणि दुसऱ्या मक्तेदाराने दुसर घेतलेल आहे. जोपर्यंत हा मक्तेदार एंड पर्यंत पोहोचत नाही तोपर्यंत दुसरा मक्तेदार काम करू शकत नाही , पहिला टप्पा पुर्ण झालेला आहे दुसऱ्या कामाची त्याने खोदाई केलेली आहे. त्याला आपण या कामा बाबत नोटीसा सुध्दा दिलेल्या आहेत आता त्याला अंतिम नोटीस काढण्यात आलेली आहे . काल परवाच त्याच्या सोबत बैठक झालेली आहे . सध्या काय आहे की वाळु मिळत नाहीये , वाळुचे ट्रक्टर पकडले जाताहेत. जर वाळु चालु झाली तर ते म्हणाले होते की २० /२२ तारखेनंतर वाळु चालु होणार आहे. ती सुरू झाली की मग आपण कामाला सुरूवात करू.

**मा.सभापती :-** हे बघा आजची २२ तारीख आहे , पुन्हा त्याचा फॉलो ठेवा कारण दोन दोन वर्ष केवढा कालावधी होतो एवढा चालणार नाही . तशी त्याला नोटीस बजावा .

**शहर अभियंता :-** नोटीस दिली आहे आपण .

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** हाच विषय करतो , सुलभ शौचालयाचा विषय आहे. जळगांव शहरातील शिवाजी नगर उड्डाण पुलाचे काम चालु आहे.शौचालयाचा विषय आहे शिवाजी नगर उड्डाण पुलाच्या दोन्ही बाजुला सुलभ शौचालय तयार करण्याचा प्रस्ताव दाखल आहे तो तुम्ही सहमतीने पास करावा . भविष्यात पुढे

**मा.सभापती :-** प्रशासनाने या सूचनेकडे लक्ष द्यावे . हि चांगली सुचना आहे की आता जो उड्डाण पुल होतो आहे तेथे नितांत गरज आहे शौचालयांची दोन्ही साईडला आपण आपल्या मनपा कडुन ते करू शकतो आहे तर त्याचा प्रशासनाने प्रस्ताव लवकर तयार करून तो द्यावा.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** ईच्छादेवी चौक ते डि-मार्ट पर्यंत रोड साईडला कल्व्हर्ट टाकणे आणि पोल उभारणे याच काम हे जे टेंडर निघुन एक झाले आहे अजुन त्याला वर्क ऑर्डर मिळाली आहे पण काम सुरू होत नाहीये तर बऱ्याच वेळा सांगुन आपले इंजिनियर दिसले होते त्याठिकाणी तर त्या ठिकाणी थांबलो मी काहीतरी आखणी वगैरे करीत होते.मला असे वाटले की उद्या पासुन काम सुरु होईल. परंतु त्याला आता पर्यंत काही मुहुर्त सापडत नाही. मला ते ही कळत नाही का थांबलं आहे. मध्यंतरी बाबा साळुंखेंनी सांगितले की, आठ एक दिवसात सुरु होईल. त्यांना टी.पी.कडनं काही लाईन आऊट मिळाली नाही. त्यानंतर मी बघीतले दोन्ही बाजुने ट्रॅफिक जाम होत आहे. अनेक ॲक्सीडंट झाले आहे त्याठिकाणी , शासकीय फंडाच काम आहे तर लवकर व्हायला पाहिजे अशी अपेक्षा आहे. मागच्या काळापासुन मागच्या टर्म पासुन मी या विषयाला चालना देत आहे बोलत आहे. मी बोलत आहे पण अधिकारी बोलत नाही.

**श्री.सुशिल साळुंखे :-** मा.सभापती, या रोडवर ट्रॅफिक झाली होती परंतु अतिक्रमणचा काही विषय होता तर अतिक्रमण काढला गेलेला आहे. नंतर टी.पी., बांधकाम आणि केबलवाल्यांचे माणसं यांनी संयुक्त करुन अंतीम जे आहे ते फाईनल केललं आहे. रस्ता कलरींग व कोडींग करुन मटेरिअल साईटवर टाकलेलं आहे. त्यामुळे आता काम दोन चार दिवसात सुरु होईल.

**मा.सभापती :-** दोन चार दिवसात सुरु होईल.

**सौ.रेश्मा काळे :-** मा.सभापती महोदया, जळगांव शहर मे महिलों के लिए कोई Specific Toilet नही है तो आप कृपया उसकी व्यवस्था करे.

**मा.सभापती :-** खुप चांगली सुचना आहे. सभापती म्हणुन जेव्हा पदभार स्विकारला, हा एक आरोग्याचा विषय आहे काळजीचा विषय आहे. या बद्दल मी सभागृहाला सांगु इच्छिते अनेक एन.जी.ओ. शी माझं बोलणं झालेलं आहे. काही कंपनींशी माझं बोलणं झालेलं आहे. आता आयुक्त साहेबांना मी याची सुचना दिलेली आहे. याचं ॲक्शन प्लॅन्स झालेली आहे की आपण वेगवेगळया ठिकाणी आपण असे पब्लीक टॉयलेट करु ज्यात लेडीज आणि जेन्टस टॉयलेट असणार आहे काही ठिकाणी पार्कींगही असणार आहे. मला वाटतं माझं उपायुक्त दंडवते साहेबांशी याबाबत बोलणं झालेलं आहे. प्रशासन काही स्पॉट सुचविणार आहे. प्रायोरिटीने ते सुचवावे असे स्पॉटींग तिथे असले पाहीजे . जळगांवातील महिलांची ही खुप मोठी समस्या आहे. एखादी महिला जेव्हा मार्केट एरिया मध्ये येते किंवा जेव्हा जळगांवात येते तेव्हा ती तिन चार तासांसाठी येत असतात . आणि त्यावेळेला हा प्रश्न गंभीर असतो आणि हा हक्क आहे महिलांचा असा हा प्रश्न च्या बाबतीत स्थानिक स्वराज्य संस्थेची ही जबाबदारी आहे की आपण टॉयलेट उभारले पाहीजे . आणि यापुढे मी काम करते आणि प्रशासनाने

स्पॉट लवकरात लवकर आम्हाला सुचवावे . एनजीओ आणि कंपनी काम करण्यासाठी माझ्याकडे तयार आहे .प्रशासन स्पॉट सुचविल्या नंतर आपण या कामाला सुरूवात करूया.

**श्री.विष्णु भंगाळे :-** अध्यक्ष महोदय , मी एलईडीच्या बाबतीत प्रश्न विचारतोय की या शहरामध्ये मागे एलईडी आपण लावत होतो ते काम परत बंद झालं .पुन्हा ऐकण्यात होते की एलईडी आपण सुरू करतोय . त्याची आजची पोझीशन काय आहे. कारण गांधी नगर एरीयामध्ये काल बाहेरची संपुर्ण स्ट्रीट लाईट पुर्णपणे बंद होती .बरेच लाईटं बंद आहेत.

**श्री.सुशिल साळुंखे :-** ईएसएल कंपनीचा ठेका हा रद्द करण्यात यावा असा महासभेने ठराव केलेला होता. त्यातील ज्या त्रुट्या आहेत त्याकरीता आपण कंपनीला एक महिन्याची नोटीस दिलेली आहे. त्या संबंधी कंपनीने काही चुका मान्य करून काम पुन्हा सुरू करण्याबाबत सांगीतले होते त्यानुसार कंपनीस आपण सुचना दिलेल्या आहेत. सगळयात मुख्य बाब हि आहे की हया संपुर्ण एलईडी चा डिपीआर तयार करणे आपण मागच्या वेळेस काम सुरू केलेले होते. त्यावेळी डिपीआर नसल्यामुळे या त्रुटी निर्माण झाल्या होत्या त्यावेळी आवश्यकता नसतांना वेगवेगळया प्रकारचे फीक्चरर्स बसविण्यात आले. डिपीआर हा सगळयात महत्वाचा भाग असल्यामुळे डिपीआर सर्वेचे  काम आता दोन प्रभागात काम सुरू असुन डिपीआर तयार झाल्यानंतर मेन्टेंनस की ज्या भागात जुने बंद पडलेले आहे. आधी ते सुरू होईल आणि मग नंतर डिपीआर नुसार त्यानंतर नविन प्रभागांचा काम करण्यात येईल.

**मा.सभापती :-** अजुन किती दिवस लागतील, दहा दिवस म्हणजेच पुढच्या आठवडयात काम सुरु होईल.

**श्री.सुशिल साळुंखे :-** हो मॅडम.

**श्री.विष्णु भंगाळे :-** नक्की विचारुन घ्या. कसं आहे सभापती महोदया, वॉटर ग्रेसला नोटीस दिली परंतु अधिकाऱ्यांना आठवे ना. अधिकारी म्हणतात आम्ही सही केली पण मी वाचलं नाही. नक्की ही जबाबदारी कोणाची आणि कोणत्या जबाबदारीच्या माध्यमातुन आपण ही नोटीस दिली आणि काय नोटीस दिली. जेणे करुन पुढील कामांमध्ये सुधारणा होतील का. येणाऱ्या कालावधी मध्ये दुसऱ्या योजना आपण त्याच्यावर राबविणार आहोत. त्याचा खुलासा आपण सादर करावा.

**आरोग्याधिकारी :-** वॉटरग्रेस कंपनीला जी काही नोटीस दिली आपण काल ? तर त्यानी मागच्या बिलात जे काही त्रुटया होत्या. त्या त्रुटयांच्या पुर्तता करावी यासाठी नोटीस दिली.

**श्री.विष्णु भंगाळे :-** आजच्या वृतपत्रात वाचलं आणि आम्ही असे ऐकले की, आपण नोटीसवर सही केली पण वाचलं नाही. हा प्रकार कसा घडला, आपण जर नोटीसीवर सही करतो आणि कश्यावर सही करतो हे जर समजत नसेल तर अश्या प्रकारे काम करतात का. मार्गदर्शन आम्हाला कश्या प्रकारे समजेल.

**आरोग्याधिकारी :-** मी गाडी चालवत होतो आणि गाडी चालवतांना मला लोकमत प्रतिनिधीचा फोन आला. त्यावेळेस जे ७ ते ८ मुद्दे होते ते सांगणे शक्य नव्हते. म्हणुन मी त्यांना म्हटलो.

**श्री.विष्णु भंगाळे :-** चौथा खांब हा वृतपत्र आहे आणि त्यांच्या प्रतिनिधीचा जर फोन आला आणि तुमच्या सारख्या व्यक्तीमत्वाने जर आरोग्य विषयी आपल्यावर मागील काळापासुन जे चालु आहे. आमदार असतील, महापौर असतील आणि त्यांना पाहणी दौरा करावा लागतं. जरी तुम्ही त्यांचा गांर्भियाने उत्तर देत नसाल. तर त्याचं परिणाम काय होतात हे आपण आज पाहिल असेल. जर तेच चांगल्या प्रकारे उत्तर दिलं असतं तर आम्हीपण समाधानी झालो असतो.तुम्ही असच सांगितलं आणि दर वेळेला असच सांगता परंतु तुम्ही जागृत्तेने लक्ष द्यायला पाहिजे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** अध्यक्ष महोदय ,याच विषया वर बोलतो , आता आपले ४०० कामगार आहेत आता लोक शेंदुर लावुन देव बनवुन ठेवतात आणि आपले कर्मचारी यांनी ते उचलायचे का आता एवढे खर्च करुन तुम्ही लोकं काय करताहेत मग कशावर करताहेत तुम्ही खर्च म्हणजे लोकाकडुन अपेक्षा ठेवायच्या की तुम्ही देव शेंदुर लावुन ठेवायचा आणि याचं काय करायच. हे नगरपालिका , प्रशासन नाकारू शकत नाही .पत्रकार लोक वाभाडे काढतायत.

**श्री.सुनिल खडके :-** तो जो शेंदुर लावण्याचा जो प्रकार आहे तो माझ्या वॉर्डातच झालेला आहे. म्हणजे अयोध्या नगरला तर म्हणजे ही जी घाण पडलेली आहे. ती घाण अगदी कोपऱ्यावर होती आणि वॉटर ग्रेस वाले काय करताहेत. म्हणजे आपण मागणी केली तर म्हणतात की आपल्याकडे ट्रॅक्टर नाही . म्हणजे ट्रॅक्टर  ने नाही उचलायचे फक्त घंटागाडया घेवुन फिरता सगळीकडे त्यामुळे ती घाण उचलली जात नाही वेळोवेळी दुसरं सांगायचे आहे साहेब आम्ही नगरसेवक आहे आम्ही की नगरसेवक डायरी चालु करावी.त्याचं काय झालं. नगरसेवक डायरी चालु करायच आयुक्त साहेबांनी पण सांगीतल होत हा विषय. साफसफाईच्या बाबतीत डायरी होती, ईलेक्ट्रीकच्या बाबतीत नगरसेवक डायरी होती. मागच्या मिटींगलाही विषय झाला होतं. सभापतींताईंनी स्पेशल सांगितलं होतं. अंमलबजावणी केव्हा होणार आहे.

**मा.उपायुक्त (आरोग्य विभाग) :-** मा.सभापती, साफसफाई संदर्भात जे काही नगरसेवक डायरी सुरु करायची होती त्याची मागणी भांडार विभागाकडे आहे. त्यांनी मला काल सॅम्पल दाखविल. जो सॅम्पल पुर्वीचा आहे त्यात काही बदल करण्याची आवश्यकता नाही. परंतु त्यांनी सांगितलं की, दोन ते तीन दिवस छापुन आणायला लागतील. अन्य भाग डायऱ्या सुरु करायची का नाही हे मी आयुक्त साहेबांना विचारायला सांगितले.

**श्री.विष्णु भंगाळे :-** तो पर्यंत आपल्या जुन्या डायऱ्यांच्या मागचे पान अर्धे अर्धे  खाली आहे जर प्रभागात शोधल्या तर सापडतील. त्यावर आपण काम सुरु करू शकता.

**मा.उपायुक्त (आरोग्य विभाग) :-** एस.आय. आणि सी.एस.आय. यांना मी जुन्या डायऱ्या सुरु करायला सांगतो. नंतर नविन आल्यानंतर, फक्त मी एक सुचना करायला सांगितली. १४० पानांच्या ऐवजी जर ३०० पानांची जर ठेवली. तर डबल खरेदी करण्यापेक्षा एकच खरेदी करुन दिर्घ काळासाठी चालेल.

**श्री.सुनिल खडके :-** आता तुम्ही बिल काढुन टाकलेल आहे. पण सर्व नगरसेवकांची तक्रारी आहे. तर जो ठेकेदार आहे वॉटरग्रेसवाला , नगरसेवकांच्या डायरीनुसारच त्याच बिल अदा करण्यात याव. नगरसेवकांच समाधान असेल तरच त्याच बिल देण्यात याव नाही तर त्याला बिल देण्यात येऊ नये.

**मा.उपायुक्त (आरोग्य विभाग) :-** जी डायरी आहे त्यात दोन कॉलम आहे. दिलेली सुचना, आलेली तक्रार आणि त्याची पुर्तता झालेली असेल तर सन्मा.सदस्यांची सही.

**श्री.विष्णु भंगाळे :-** सभापती महोदया, जस नगरसेवक श्री.सुनिल भाऊंनी सांगितलं. उपमहापौरची सुचना असल्यावर सुध्दा बिल दिलेल आहे. असं वाटतं की, नगरसेवकांच्या डायरीची सुचना मांडल्यानंतर यास मनोबल येईल का ? एक हे आपण सभागृहाला सांगाव. आणि आपल्या आरोग्याच्या बाबीतीत खुप प्रश्न चालु आहे. मला काल परवाच सांगितलं गेले की, मुख्य स्वच्छता निरिक्षक श्री.नेमाडे यांनी स्वत: हुन निवृत्ती घेण्याचा अर्ज केलेला आहे. ही अशी वेळ आहे की, स्वच्छता करणेसाठी माणसं कमी पडत आहे आणि आपण ठेका दुसऱ्याला देत आहोत. जे चांगले काम करतात ते असे स्वत:हुन निवृत्ती घेत असाल तर याचं कारण काय ?

**आरोग्याधिकारी :-** त्यांची तब्येत खराब असते आणि १५ दिवसापुर्वी चेसपेन झाले होते. त्यांना वेदना आहे छातीच्या. ते आजारी असतात. त्यामुळे त्यांनी अर्ज केलेला आहे की मला डायबीटीस असल्यामुळे खुप त्रास होतो. म्हणुन त्यांनी अर्ज केलेला आहे. परत चेसपेन झाले होते त्यांना हॉस्पीटल मध्ये होते ते.

**श्री.विष्णु भंगाळे :-** नक्की फक्त इतकं एकच कारण आहे.

**आरोग्याधिकारी :-** डॉक्टरांनी तर हेच सांगितलं.

**श्री.विष्णु भंगाळे :-** ही स्वेच्छा निवृत्ती घ्यायची आहे म्हणुन का, आता बरेच लोकं आहे ते यानंतरही धावपडळ करता आहे. बरेच कामे करत आहे. देशाच काम करत असतील राज्याच काम करत असतील. ज्यांच्या बायपास झालेली आहे ते पुर्ण वेळ काम करतात.तो विषय नाही पण आज आपल्याला आवश्यकता असतांना जे चांगले अधिकारी असतील ज्यांच्याकडनं आशा आहे. प्रत्येकाला आहे आणि कोणताही अधिकारी नेमाडे विषय बोलला तर मी म्हणेल. असा अधिकारी जर स्वत:हुन निवृत्ती घेत असेल तर आम्हाला ही काळजी वाटते की उद्या काय होईल या महापालिकेच, ते मला भेटले नाही भेटले , परंतु हे कानावर आल म्हणुन मी आपल्याला ही गोष्ट सांगत आहे. ही गोष्टी खरी आहे का त्यांनी स्वेच्छेने सेवानिवृत्तीचा अर्ज केलेला आहे.

**आरोग्याधिकारी :-** मी त्यांना सांगितले ही की, तुम्ही काळजी घ्या तब्बेतीची आणि काम करा. मी Personal त्यांना विनंती केली.

**श्री.विष्णु भंगाळे :-** तुम्ही याचा अर्थ असं म्हणाल की, जितके लोक शासकीय नोकरीत असतील त्यांना छातीत दुखत नाही. त्यांना ॲटॅक नाही. म्हणुन ते नोकऱ्या करत आहे. असं होतं का ?

**मा.सभापती :-** हा खुप मोठा प्रश्न आहे. प्रशासनाला आणि उपायुक्त साहेबांना मी सांगेल की, प्रशासनाने या गोष्टीची दखल घेतली पाहिजे. आपले अधिकारी व कर्मचारी जे आहे आणि चांगले कर्मचारी जे आहेत. त्यांच जर मनोबल कमी होत असेल तर त्याच्यावर कामाचा आढावा घ्या. असं आहे की चांगल्या व्यक्तीची आपल्याला गरज आहे. त्यांचा मनोबल वाढुन घेण्याच आपण प्रयत्न करायला पाहिजे आणि त्यांना येथे टिकुन राहण्याची आणि काम करण्यास आपण प्रवृत्त केले पाहिजे.

**मा.उपायुक्त (आरोग्य विभाग) :-** जर त्यांना असा काही अर्ज दिलेला असेल तर मी काही पाहिला नाही. अर्ज त्यांनी काही कारणामुळे दिलेला असेल त्या व्यतिरिक्त काही कारण नसेल तर मी नक्कीच त्यांच्याशी चर्चा करेल. ते अर्ज मागे ही घेता येईल. त्यांना इतर काही अडचण होत असतील तर याची दक्षता घेऊ आणि होत नसेल. तर ते अर्ज तीन महिन्याच्या आत त्यांना मागं ही घेता येईल.

**मा.सभापती :-** यात आपण स्वत: लक्ष घालवायला पाहिजे.

**श्री.विष्णु भंगाळे :-** याच्यावर मी उपायुक्त साहेबांना विचारु ईच्छितो, आता आपल्याकडे आरोग्य निरिक्षक कमी आहे. तर जे सफाई कामगार आहे माझ्या माहितीनुसार १० सफाई कामगार आहे ते आता आरोग्य निरिक्षकाच काम करत आहे. त्यांचं मनाच खच्चीकरण होत आहे. आपले जे आरोग्य निरिक्षक आहे ते सोडुन जात आहे आणि इकडे सफाई कामगार त्या पदावरती काम करत आहे.आता जे आरोग्य निरिक्षक म्हणुन जे सफाई कामगार काम करीत आहे. त्यांना आपण कमीतकमी त्यांना मानधन तरी द्याव, पेट्रोल अलाऊंस तरी द्यावा. जेणे करुन मनापासुन ते काम करतील. आणि शहराच्या साफसफाईच्या दृष्टीने विचार करतील. अशी माझी सभागृहाला विनंती आहे.

**मा.सभापती :-** उपायुक्त साहेब आपण याची थोडीशी माहिती घ्यावी आणि कसं काय करु शकतो ते पाहावे.

**मा.उपायुक्त (आरोग्य विभाग) :-** जो फिल्डवर काम करतो त्याला शासनानेच ठरुन दिलेलं आहे पेट्रोल अलाऊंस, मागच्या एक दिड महिन्यापुर्वी मी सुचना ही दिली होती. तुम्ही फक्त एक अर्ज करा. किती द्यावं हे पहिले डिस्प्युट होतं. पण किती दिल पाहिजे हे शासनाने ठरवुन दिलेलं आहे. तो ईलेक्ट्रीशियन असेल, सॅनिटेशन असेल किंवा अन्य विभागाचा

असेल.म्हणजे आपणही सॅनेटरी इन्सपेक्टरला सुचना दिली होती की, तुम्ही मागणी करा. शासनाने ठरविलेली रक्कम तितकी देऊ. किमान एक रक्कम ठरली आहे. तर सक्षम प्राधिकरणाची मान्यता घेऊन ते देता येईल.

**श्री.विष्णु भंगाळे :-** मा.सभापती महोदया, माझे हे म्हणणं आहे की, आता आरोग्य निरिक्षक जे चांगलं काम करीत आहे ते स्वेच्छा निवृत्ती घेत आहे. त्यांच मन बदलेल किंवा नाही बदलेल. मी असे एकलेले आहे की एक दोन अजुन अर्ज देण्याची तयारीत आहे. उद्या हाच विषय सभागृहात येईल परत. अशी जर की वेळ आली तर जो सफाई कामगार या पदावर काम करीत आहे तो तरी टिकला पाहिजे. किंवा जो आरोग्य निरिक्षक आहे त्याने सन्मानाने सुरु होत तो जो काम करत होता तर आजच अशी काय वेळ आली याच्या कडे आपण लक्ष द्यावं ही मी विनंती करतो.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** फॅगींग मशिनच काय झालं, प्रभागनुसार फॅगींग मशिन घ्यायला सांगितली होते.

**आरोग्याधिकारी :-** भाऊ ते सर्व पाठवुन देणार आहे. ४ मशिन आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** ४ ने काय होणार. सर्व शहरासाठी महत्वाचा विषय आहे तो.

**मा.उपायुक्त (आरोग्य विभाग) :-** भांडार विभागाने काल काही मशिन ही काढली आणि काही दुकानदारांना ही बोलविलं होतं. आणि ती मागणी आयुक्त साहेबांची मंजुरी घेऊन ते पुढे करण्यात येईल.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** अध्यक्ष महोदय अमृतचा विषय आहे. अमृतची योजना सुरु झाली त्याच्यामुळे संपुर्ण जळगांव शहरात खड्डे पडलेले आहे. आता ड्रेनेजचा विषय घेतला तुम्ही आमच्या प्रभागातुन. जो पर्यंत अमृतचे खड्डे बुजवत नाही तो पर्यंत ड्रेनेजचा काम करायचे नाही. कारण त्यांनी जे चाऱ्या खोदल्या ते बुजविणार आहे का? कॉंक्रीटचे आहे तर कॉंक्रीटचे बुजविणार आहे का ? डांबरचे केले तर डांबरने बुजविणार आहे का? त्याचं त्यांनी उत्तर द्याव.

**श्री.दिलीप पोकळे :-** आता ड्रेनेजचा जे काम आहे. तर आता पहिल्या टप्प्याच काम शिवाजी नगरमध्ये चालु आहे. अमृतच आणि ड्रेनेजच जे नियोजन आहे. त्यांनी सांगाव. अमृतच काम किती झालेलं आहे आणि किती शिल्लक आहे. त्याच्यानंतर ड्रेनेजच काम कुठपर्यंत आलेल आहे. कारण तीन महिन्याच काम पुर्ण होईल, तीन महिनेचे चे चार लागतील. असे आम्हाला सांगता येतं. पण हे झाल्यानंतर काय सांगायचं त्याचं उत्तर यांनी द्याव. याचं पुर्ण नियोजन यांनी सांगाव.

**श्री.योगेश बोरोले :-** उर्वरीत कामे सुरु आहे आणि त्यांच्याशी कालच बैठक झाली. त्यांनी काम चालु केलेले आहे. ड्रेनेजचं काम पहिल्या टप्प्यात चालु करत आहोत. आणि त्यात रोड सेटींगचा काम त्यांनी घेतलेलं नव्हतं. आता त्यांच्या Executive Engineer शी चर्चा झाली. आता ते काम मंजुर करुन ते काम करायला तयार आहे.

**मा.सभापती :-** कोणत्या पध्दतीने करणार आहे.

**श्री.योगेश बोरोले :-** ज्या ठिकाणी WBM आहे त्या ठिकाणी WBM. ज्या ठिकाणी कॉंक्रीट आहे त्याठिकाणी कॉंक्रीट व ज्या ठिकाणी Asphalt त्या ठिकाणी Asphalt.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** आता अमृतचा तुम्ही तसाच केल, पुर्ण रोड खोदुन ठेवले आहे तुम्ही. या अवरा म्हणुन भरुन घेतलं त्यांनी आणि आता तुम्ही फिरा त्याच्या मागे वर्षभर.

**श्री.योगेश बोरोले :-** हे आपण मंजुर करुन घेऊ आणि मग कट करुन घेऊ.

**श्री.विष्णु भंगाळे :-** ड्रेनेज मध्येपण असे आहे का ?

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** मागच्या अमृतच्या चाऱ्या बुजवायच्या आता सांगत आहे ते. याची हमी कोण घेईन.तुम्ही घेसान का?

**श्री.योगेश बोरोले :-** नाही आता मंजुर करुन घेतलेलं आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** तुमच्याकडे निधी शिल्लक आहे का त्यासाठी.

**श्री.योगेश बोरोले :-** आता Extra मंजुर करुन घेतो.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** पहिले का केलं नाही.

**श्री.योगेश बोरोले :-** आम्ही दिलं होतं.

**श्री.**नवनाथ दारकुंडे :- असेच काही कारण सांगायचे कोर्टात वेळ लागलं असे सांगायचे आणि लोकांना विठीस धरायचे आणि आम्ही लोकांचे शिव्या खायचे का ?

**श्री.योगेश बोरोले :-** मंजुर करुन घेऊ.

**श्री.नवनाथ दारकुंडे** :- पहिले का नाही केलं. तुम्हाला माहित होतं ना, सर्व प्रकरण तुमच्याच कडे होतं. आता निधीतुन दंडातुन करायला काहीच फायदा नाही. तोंड तर आम्हाला द्यावं लागतं लोकांना आता तुम्ही मंजुर करणार आणि त्या दिवशी तुम्ही जे प्लॅन दाखविलं त्यातील काही भागात लाईन आता टाकले, काही गल्ल्यात. आता भरले तर ड्रेनेजच्या वेळेस वापीस होणार नाही का ते खड्डे.

**श्री.योगेश बोरोले :-** ज्या भागात काम सुरु होईल त्या भागात परत खोदला जाणारच आहे. त्याच्यामुळे त्यात आपण ते इस्टीमेट घेतले आहे आता.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** पहिले का नाही केलं मग.

**श्री.योगेश बोरोले** :-पहिल्या पासुनच त्यांना लेखी दिलेले होते की या ईस्टमेटचे काम घ्यावे असे. परंतु एमजीपी ने ते मंजुर करून घेतले नव्हते. आता परत आयुक्त साहेबांशी बोलणे झाले आहे आणि त्यांनी सांगीतले आहे की आता आपण मंजुर करून घेवु.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** आपण सांगा भाऊ.

**श्री. दिलीप पोकळे :-** सभापती महोदय , हा जो विषय यांच्या मध्ये दुर्लक्ष आणि निष्काळजीपणा आणि आज सभागृहामध्ये बोरोले साहेब जी माहिती देता आहेत त्याची नोंद घेण्यात यावी. ते काय पमेंट करणार आहेत कसे वितरण करणार आहेत. त्याची माहिती लेखी स्वरूपात सुध्दा मागवुन घ्यावी. त्याच्यानंतर एकच माहिती पाहीजे की गटारचे, अमृत चे काम जे थांबत आहे.आता ते तारीख सांगता आहेत आता हे पुर्ण शहराचे आहे की काही भागापुरते आहे , सर आमच्या वॉर्डात तर अमृत जे काम आणि गटारीचे काम हे खोदतांना त्यांनी तातडीने त्याची व्यवस्था करून द्यावी .असा यांच्याकडुन ताबडतोब खुलासा घ्यावा. आणि यांनी जर सभागृहाची दिशाभुल करण्याचा प्रयत्न केला अस सिध्द झालं तर त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात यावी.

**श्री. विष्णू भंगाळे :-** सभापती महोदय , सर्वच वॉर्डातील अडचण आहे . त्या त्या वॉर्डात जे अमृत योजनेचे जे काम झालेले आहे. की माझी एक विनंती आहे की सर्व प्रभागामध्ये म्हणजे ज्या ज्या प्रभागात अमृत योजनेचे असतील किंवा ईतर खड्डे जे असतील काही ठिकाणी अमृत योजना नाही तिथे सुध्दा खड्डे आहेत .ते बुजल्याशिवाय ही अंडरग्राऊंड ड्रेनेज ची जी योजना आहे हे काम चालु करू नये . याचा रोष त्या त्या प्रभागातील नगरसेवकांवर व आपण सत्तेवर असलेल्या सर्व पदाधिकारी यांच्यावर येतो . आणि मग आम्हाला , नगरसेवकांना तोंड द्यावे लागते म्हणुन विनंती आहे की कारण या भावना सर्व नगरसेवकांच्या आहेत पण कितीदा बोलावे याचा प्रश्न आम्हाला पडतो म्हणुन विनंती आहे की याच्याकडे गांभीर्याने लक्ष द्याव.

**मा.सभापती :-** प्रशासनाला हि विनंती आहे की , या सर्व ज्या समस्या आहेत या सगळया जळगांवच्याच आहेत . मला वाटत जळगांव कर म्हणुन तुम्ही सुध्दा हे सगळे फेस करता आहात .याची सर्वांनी नोंद घ्यावी आणि पुन्हा पुढील सभेपर्यंत वर्कआऊट करा.

# सि.डी.क्रं. २

**श्री. राजेंद्र पाटील :-** आरोग्याशी संबंधित विषय आहे मागील महासभेमध्ये मी विषय मांडला होता. आमच्या प्रभाग क्रं. १४ मध्ये ट्रक्टर मिळालेले नाहीत . खान साहेबांनी त्या सभेमध्ये सांगतले होते की आज आपल्याकडे ट्रक्टर आलेले आहेत.परंतु काम करणेसाठी आजपर्यंत एकही ट्रक्टर आमच्या प्रभागामध्ये मिळालेलं नाही. आणि मला त्यांना विचारायच आहे , जर ठेकेदार ट्रॅक्टर पुरवत नसेल तर त्यांना दिवसाला किती फाईन आहे एका ट्रक्टर साठी .

**श्री. एच.एम.खान :-** दंडाची आकारणी सुरू आहे . मात्र

**श्री. राजेंद्र पाटील :-** नाही नाही किती आहे दिवसाला किती आहे.

**श्री. एच.एम.खान :-** पाच हजार आहे .

**श्री. राजेंद्र पाटील :-** एका दिवसाला एका ट्रॅक्टरसाठी पाच हजार आहे.

**श्री. एच.एम.खान :-** होय .

**श्री. राजेंद्र पाटील :-** बरोबर ना

**श्री. एच.एम.खान :-** होय .

**श्री. राजेंद्र पाटील :-** एका प्रभागासाठी त्याने किती ट्रक्टर पुरवायला पाहीजे.

**श्री. एच.एम.खान :-** दोन ट्रक्टर प्रत्येक प्रभागाला

**श्री. राजेंद्र पाटील :-** मग आता तुम्ही त्यांना १० हजार रू दंड करता आहेत.

**श्री. एच.एम.खान :-** दैनंदिन दंडाची आकारणी करतो आहे आपण

**श्री. राजेंद्र पाटील :-** आज रोजी आहे का तिथे ट्रॅक्टर कि नाही.

**श्री. एच.एम.खान :-** त्यांनी एक ट्रक्टर दिलेले आहे मात्र तो काम करतांना.

**श्री. राजेंद्र पाटील :-** नाही सभेच्या दिवशी सांगतात तुम्ही की आल आहे.दुसऱ्या दिवशी नसतं.

**श्री. एच.एम.खान :-** तो काय करतोय की ट्रक्टर दुपारून घेवुन लोडर करतोय आणि जे खोपडी ट्रक्टर आहे एक दोन ब्रेक दिला आहे .

**श्री. राजेंद्र पाटील :-** मला कालच्या दिवशी फाडलेल्या पावत्या दंडाच्या त्या दाखवुन द्याव्यात.

**श्री. एच.एम.खान :-** होय रिपोर्ट दाखवुन देतो.

**श्री. राजेंद्र पाटील :-** हा तसेच १० हजार रू .प्रमाणे दंड केलेला आहे . त्याच्याप्रमाणे त्याच्या पावत्या दाखवुन द्याव्यात .तसेच आज जर का त्याचं ट्रॅक्टर आलेले असेल त्याचा ट्रॅक्टरचा क्रमांक आणि ड्रायव्हरचे नांव व त्याचा मोबाईल नंबर द्यावा.

**श्री. एच.एम.खान :-** होय साहेब.

**श्री. सदाशिव ढेकळे :-** सभापती महोदय , जळगांव शहरामध्ये मोठया प्रमाणामध्ये मच्छरं झालेले आहेत . तर ती धुरळणी करावी . त्याच्यामुळे लागण झाली आहे त्याच्यामुळे थंडी , ताप सारखे आजार आता खुप झाले आहेत. आता येथे जर ते डिपार्टमेंट आलेले असेल तर त्यांना बघा धुरळणी करणेसाठी सांगा .

**डॉ.विकास पाटील ,आरोग्याधिकारी :-** दादांनी आत्ता जो प्रश्न मांडला. तर आम्ही साप्ताहिक एक प्रोग्राम आम्ही केलेला आहे. त्यानुसार दर १५ दिवसामध्ये प्रत्येक भागात धुरळणी चालु केलेली आहे.

**श्री. सुनिल खडके :-** १५ दिवसामध्ये म्हणजे कसं.एका वॉर्डात १५ दिवसांनंतर आता आला का कुठे आहे आता मी १५ दिवसांपुर्वी मागणी केलेली होती . जुने जळगांव मध्ये की आमच्या वॉर्डात डेंग्युचे हे आढळले , त्यांना मलेरिया वाल्यांना फोनही केला आम्ही तर म्हणे हो प्रोग्राम बनवला आहे , प्रोग्राम पाठवला आहे. कुठे आहे प्रोग्राम कुठे आले ते प्रोग्राम नुसार कधी पर्यंत येईल तुमचा प्रोग्राम.

**मा.सभापती :-** सर्व नगरसेवकांना त्यांच्या त्यांच्या वार्डाची माहिती द्या.

**श्री. सुनिल खडके :-** मागणी करा तुम्ही, फॉगींग मशिन वाढवा. लोकांना वेठीस धरण्यापेक्षा आणि १५ दिवसाचा प्रोग्राम बनविण्यापेक्षा. काय होतं तुम्ही १५ दिवसाचा प्रोग्राम बनविता आणि समजा यांच्या भागात डेंगुची पेशंट आढळली तर ते सोडुन तुम्ही तिथे जातात की नाही. जाता की नाही. फॉगींग मशिन किती आहे तुमच्याकडे.

**आरोग्याधिकारी :-** दहा आहे.

**श्री. सुनिल खडके :-** पुरतात का तुम्हाला.

**आरोग्याधिकारी :-** ते तर पुरत नाही.

**श्री. सुनिल खडके :-** मग मागणी दिली का तुम्ही फॉगींग मशिनसाठी की, मशिन वाढवा, फॉगींग वाढवा, दोन लोकं वाढवा.केली का मागणी ?

**आरोग्याधिकारी :-** फॉगींग पेक्षा अबेटींग बरं आहे. अबेटींग जे करतो आपण, पाण्यांच्या भांडयात जे अबेटींग करतो. अबेटींग करणं भांडे रिकामे करणे हे आपले चालु आहे.

**श्री.विष्णु भंगाळे :-** कितीदा केलेली आहे आपण.

**आरोग्याधिकारी :-** एकदा केलेली आहे. पुर्ण एक लाख दहा हजार घरात केलेलं होतं.

**श्री.विष्णु भंगाळे :-** कोणत्या दिवशी केली, कधी राबविली मोहीम. कोणत्या भागात राबविली.

**आरोग्याधिकारी :-** जुलै व ऑगस्ट महिन्यामध्ये पुर्णपणे राबविलेली आहे आपण. आता डेंगु परत आलेला आहे.

श्री.विष्णु भंगाळे :- प्रवक्ते साहेब आमचं फक्त इतकच म्हणणं आहे आपल्याला जे विचारलं जात आहे त्याचाच उत्तर द्या. तुम्ही स्वत: दुसरी कडे चालली जातात.जर आम्ही तुम्हाला सांगितलं की या गल्लीत कचरा आहे. तर तुम्ही सांगतात, हो गेला माणुस, आम्ही आता आलो तेथुन की कचरा आहे, ट्रॅक्टर पाठवा. तुम्ही म्हणतात गेला. इतकं जर तुम्हाला शंकर सारखं जर डोळा असेल तर हे सभागृह बोललंच नसतं.

**श्री.सुनिल खडके :-** फॉगींग मशिन किती बंद आहे आपल्याकडे .

**आरोग्याधिकारी :-** सर्व चालु आहे. ज्या बंद होत्या ते पण चालु केल्या. काही खर्च होता. रु.२०००/- ते ४०००/- चा तो केला.

**मा.सभापती :-** सर्व सदस्यांना तुम्ही ताबडतोब कार्यक्रम पाठवा की त्यांना माहित पडेल त्यांच्या प्रभागात केव्हा होत आहे.

**श्री.सुनिल खडके :-** अंमलबजावणी होत नाही त्याची. माझ्या प्रभागात केव्हा आलात. मी सांगीतले की, माझ्या प्रभागात डेंगु पेशंट आढळला, आता पर्यंत झालं नाही. केव्हा प्रोग्राम होणार आहे तुमंचा माणुस मेल्यावर.

**आरोग्याधिकारी:-** ठिक आहे. पाहुन घेतो.

**श्री. सदाशिव ढेकळे :-** नुसते बोलताहेत तुम्ही १५ दिवसांचे आता मला एक सांगा कुठे कुठे फवारणी झाली ,कुठे कुठे झाली ते सांगा , तुम्ही १५ दिवस सांगताहेत आतापर्यंत माझ्याकडे आलेच नाही. माझ्या गणपती नगर , आदर्श नगर या भागात आलचं नाही आणि तुम्ही म्हणता की १५ दिवसांनंतर नंबर लागतो , आता तुम्हीच सांगा आतापर्यंत कुठे कुठे फवारणी झाली .नगरसेवक पण आहेत ईथे कोणत्या कोणत्या भागात झाली ते सांगा. सर्व सदस्यांना विचारतो तुमच्या भागात झाली असेल तर तुम्ही सांगा.

**श्री. विष्णु भंगाळे :-** सभापती महोदय , स्थायी च्या निमीत्ताने या सभागृहामध्ये सर्व शहराचे प्रतिनिधीत्व आहे. मला वाटतं कोणत्याच प्रभागात आलेले नाहीयेत फॉगींग मशीन आपण लक्ष द्यावे या गोष्टी कडे.

**श्री. सदाशिव ढेकळे :-** मला एक सांगा फवारणी मलेरिया वाले करतात की आपण करतात , कुठेकुठे झाली हे सविस्तर सांगा

**मलेरिया विभाग कर्मचारी :-** सर आपली जी धुरळणी आहे त्याचा आपला १५ दिवसांचा प्रोग्राम नाहीये.आपला अबेटींग चा प्रोग्राम आहे.

**श्री. सदाशिव ढेकळे :-** मग आरोग्याधिकारी असे का सांगता आहे.

**श्री. सुनिल खडके :-** मग आरोग्याधिकारी असे का म्हणता की १५ दिवसांचा प्रोग्राम बनवला आहे.

**मलेरिया विभाग कर्मचारी :-** नाही आपला जो प्रोग्राम आहे अबेटींग चा तो आपण प्रत्येक नगरसेवकांच्या घरी दिलेला आहे.आणि त्यासंदर्भात आपण त्याच्यास सहया घेतलेल्या आहेत. आपण प्रत्येकाला वाटलेले आहे .घरी दिलेले आहे.

**श्री. सुनिल खडके :-** सर ते एकच मशिन पाठवितात , मग ते होतं एक गल्ली होते , दुसरी गल्ली होते पुढच्या गल्लीतील लोक म्हणतात की हेच लाडाचे आहेत का आमच्या कडे डांस नाही का , मग मी काय म्हणतो ते लक्षात ठेवा , जर समजा

एक एरिया गणपती नगर असो , विठ्ठल मंदिरचा जुने जळगांवातील भाग असो किंवा गणेश कॉलनी असो . एक एरिया पुर्ण करा . तुम्ही काय करता एक फागींग पाठवुन देता आणि मग ते फॉगींग संपली की झालं आता चाललो आम्ही मटेरियल नाही आमच्या कडे तेवढेच मारायचे होते . साहेब हे काय उत्तर आहे का .

**मलेरिया विभाग प्रमुख :-**आपल्या कडे ९ मशीन चालु आहेत आजच्या परिस्थितीत आणि ते ९ मशीन आपल्याला ज्या ज्या नगरसेवकांचा फोन येतो त्या वॉर्डात त्या मशीन आपण त्याच्याकडे पाठवितो.आणि ती मशीन डेंग्यु च्या पेशंट चे जे घर आहे त्या घरातील मारण्याच्या उद्देशाने बनविली गेलेली आहे. त्याच्याने आपण पुर्ण वॉर्ड मारू शकतं नाही. जर आपल्याला पुर्ण धुरळणी करायची आहे तर आपल्याला .

**श्री. सुनिल खडके :-** काय सांगता आहे तुम्ही पुर्ण मारू शकत नाही . आधी आम्ही पुर्ण मारत होतो. विचारा तुम्ही विकास पाटील असो , उदय पाटील असो विचारा तुम्ही पुर्ण एरिया मारत होते की नाही आपण आधी एक एरिया पुर्ण मारत होते की नाही विकास पाटील साहेब. मारत होते की नाही आपण मग .

**मलेरिया विभाग प्रमुख :-** त्यावेळेला आपण

**श्री. सुनिल खडके :-** पुर्ण मारत होतो आपण चार चार मशीनी लावत होतो आपण प्रत्येक एरियामध्ये.

**मलेरिया विभाग प्रमुख :-** त्यावेळेला आपल्याकडे व्हेईकल मोटेड मशीन होते त्या व्हेईकल मशीन द्वारे आपण पुर्ण जळगांव शहराची जी धुरळणी आहे ती केलेली आहे. ती व्हेईकल मोटेड मशीन जी आहे ती आपण मुंबई ला पाठविलेली आहे ती फार जुनी झालेली आहे. आणि आता ते जे मॉडेल आहे म्हणजे त्याचे स्पेअर पार्ट नाही ये आता तर ती मशीन आपण दुरूस्ती करू शकत नाही. त्याच्याकरीता आपल्याला नविन मशीन खरेदी करावे लागेल .या ज्या छोटया मशीनी आहे भाऊ आपल्याला आपल्या कडे ९ मशीनी आहेत आणि रोजचे १५,१६ नगरसेवक जे असतात. तर मला ज्याही सन्मा.नगरसेवकांचा मला फोन आलेला आहे त्याच्या तक्रारींचे निवारण मी समाधानकारक पणे करून दिलेले आहे.

**श्री. सुनिल खडके :-** तुम्ही करत नाही याच्याने डेंग्यु आजारावर नियंत्रण करता येणार नाही .तुम्ही जे नगरसेवकांनी फोन केला त्यांच्याकडे जाल. ईथे ७० नगरसेवक आहेत, ७५ नगरसेवका आहेत कोणा कोणा कडे जाणार आहे तुम्ही

**मलेरिया विभाग प्रमुख :-** हो बरोबर आहे.

**श्री. सुनिल खडके :-** मग

**मा.सभापती :-** प्रशासनाने या साठी सक्त सुचना आहे.

**श्री. सुनिल खडके :-** किती मशिन नाहीये नवीन काहीतरी कराना पैसे आहे आपल्याकडे .

**मा.सभापती :-** ती मशीन ती आहे ती दुरूस्त होवु शकत नाही हे तुमच्या लक्षात आलेलं आहे तर ताबडतोब प्रस्ताव यायला हवा होता नविन मशीन साठी याच्यासाठी आपण या चर्चेची नगरसेवकांचे आरोप होण्याची वाट बघण्याची गरज नव्हती. आणि आता ईथे सगळयाचं विभाग प्रमुखांना माझी ही सुचना आहे. नगरसेवकांनी आज जे जे विषय मांडलेले आहे याची सगळयांनी नोंद घ्यायची आहे. आणि पुढच्या स्थायी मध्ये यांचे या समस्यावर निराकरण काय केल ते विभागप्रमुखांनी इथे सर्वांसमोर स्पष्ट करायच आहे. या पुढे प्रत्येक स्थायी समोर असा कार्यक्रम असणार. विभाग प्रमुख म्हणुन तुम्हाला हव तर तुमचा एक लिपीक सोबत ठेवा. तो नगरसेवक, प्रभाग याची नोंद घेईल. आणि यांची समस्या आणि पुढच्या स्थायीत तुम्ही पुढच्या आठ दिवसात दर शुक्रवारी आपली स्थायीची सभा होणार. प्रत्येक वेळेला स्थायी मध्ये आपण काय केले आहे ते सभेसमोर सांगायच आहे.

**श्री.सुनिल खडके :-** साहेब तुम्ही ५ मशिनची मागणी करा. तुम्हाला दोन तरी देईल ना. करायला गेले तर होईल. तुम्ही प्रस्ताव द्या.

**मा.सभापती :-** विभाग प्रमुखांना माझी एक सुचना आहे की, सभा प्रत्येक शुक्रवारी असणार आहे. तर जे जे कामांचे प्रस्ताव आहे ते नगरसचिवांकडे पाठवा. ते पुढच्या स्थायी मध्ये येत जातील. पुढच्या स्थायी मध्ये तुम्हाला जे प्रस्ताव पाहिजे ते आज शुक्रवार पर्यंत गेलेले पाहिजे. तर पुढच्या स्थायीला ते येऊ शकतील. ही आता Habit बनवा. नगरसेवकांची जी तक्रार आहे त्याच निराकरण, त्याच उत्तर मला सगळयांसमोर हव आहे. ही जबाबदारी त्या त्या विभागप्रमुखांची असणार आहे.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** मॅडम एक अडचण अशी होती की, आता साहेबांनी सांगितल, आम्ही जेथे डेंगु झाला असेल त्या त्या भागात मारतो, तर काय होत मॅडम तिकडचे मच्छर तेथे मारल्यानंतर पुढच्या गल्लीत जाता. तेथे डेंगु होतं.अस न करता जी मोठी मशिन आहे. मोठया वाहनावर ती जर मागुन घेतली. तर ते मागुन पुर्ण एका बाजुने जर करत गेले तर अस सर्व मच्छर नाहीसे होती आणि पुन्हा मच्छर इकडे पडतील इकडुन तिकडे पडतील अशी परिस्थिती होणार नाही. आपल्या मनात जे विचार आहे तस होईल.

**आरोग्याधिकारी :-** आता मी चार मशिनी घेतो, चार मशिनी लावतो.

**श्री.सुनिल खडके :-** साहेब, मुंबईच्या महापालिका धरतीवर जे मोठ मशिन आहे ते बघा त्याच्या किमती बघा.

**आरोग्याधिकारी :-** Actually ती मोठी गाडी असते ती आणि पुर्ण एरिया गल्लीत फॉग करते ती.

**श्री.सुनिल खडके :-** पुर्ण एरिया फॉगींग होत त्याच्याने, मागे मी गेलो होतो मुंबईत तर मी बघितल,

**आरोग्याधिकारी :-** चार प्रभागाचे चार मशिनीचा प्रस्ताव टाकतो मी आता, चार प्रभागामध्ये आपण चार गाडया लावुन ठेवलेल्या आहे. याच्या Awareness महत्वाच आहे.

**श्री.सुनिल खडके :-** केव्हाची मागणी करायला पाहिजे होती तुम्ही सर्व लोक डेंगु डेंगु करत आहे. मशिन नाही, हे नाही, ते नाही. हे उत्तर बरोबर नाही तुमचे. आपण लक्ष द्यायला पाहिजे अश्या गोष्टींमध्ये.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** अध्यक्ष महोदया, तुम्ही सभापती असतांना पहिले जागा ताब्यात घेतली बी.जे. मार्केटची. आपल्या सिव्हील हॉस्पीटलची. आता दुसरा भाग आपला रिंगरोडचा आहे. येथे कोण आहे टाऊन प्लॅनींगवाले, शेख साहेब ती जागा किती आहे जी महिला मंडळाला दिलेली आहे.

**श्री.ईस्माईल शेख(टी.पी.):-** साहेब मोठी जागा आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** तरी किती आहे ती जागा.

**श्री.ईस्माईल शेख(टी.पी.):-** १०,००० स्कु.फुटच्या वरतीच आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** आता जे घरपट्टी वगैर आहे आपण कर आकारणी केली का त्यांच्याकडुन.
घरपट्टी काय? पाणीपट्टी काय ? सांगा.

**श्री.व्हि.ओ.सोनवणी :-** ती जागा जी आहे ती महिला मंडळाने बँकेला दिलेली आहे भाडयाने आणि भाडेच्या हिशोबाने कर आकारणी सुरु आहे १९९५ पासुन.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** तुम्ही मंडळाला दिली. त्यांनी बँकेला दिली करार म्हणुन तर बँकेकडुन वसुल करायला पाहिजे की त्यांच्याकडुन वसुल करायला पाहिजे. समजा तो रु.५००/- महिन्याने देईल किंवा रु.५०००/- ठेवील. तर ती कोणाकडुन वसुल करायला पाहिजे.

**श्री.व्ही.ओ.सोनवणी :-** बँकेच्या करारानुसार वसुली करायला पाहिजे.

**मा.सभापती :-** तम्ही जे टॅक्स वसुल करत आहात तर फक्त टॅक्स वसुल करत आहात की भाडयाची आकारणी करतात.

**श्री.व्ही.ओ.सोनवणी :-** फक्त टॅक्स वसुल करतात.

**मा.सभापती :-** तुम्ही फक्त टॅक्स वसुल करतात. हे विषय तुमच्याकडे येईल. एक जागा आहे महानगरपालिकेची जे प्रथम दर्शनी अस दिसत आहे की, महापालिकेची जागा आपण जागृती महिला मंडळ अश्या मंडळाला भाडयाने दिली आणि त्यांनी ती जागा जे.डी.सी.सी. बँकेला पोटभाडयाने दिली. खरं तर हा वापर बेकायदेशीर आहे. बेकायदेशीर जर असेल तर आपण याची वेगळया पध्दतीने अंमलबजावणी करायला पाहिजे. त्याच ८१ के खाली बेकायदेशीर वापर म्हणुन वसुली केली पाहिजे.

**मा.उपायुक्त (सा.प्र.) :-** ८१ ब ची नोटीस दिलेली आहे.

**मा.सभापती :-** ईस्माईल शेख साहेब, नियमानुसार ८१ ब ची नोटीस दिलेली आहे. जेव्हा मी माहिती घेतली की, already नोटीस दिलेली आहे. त्यानंतरही आता पर्यंत जागाचा ताबा घेतलेला नाही. आजच्या तारखेत तेथे जागृती महिला मंडळ दिसत नाही. कोणतही सामाजीक संस्था सामाजिक काम करत आहे का ? नाही. त्या जागेचा वापर काय होत आहे, व्यावसायीक वापर होत आहे. हे बेकायदेशीर आहे तर ८१ ब ची कार्यवाही करायला पाहिजे होती. मी या ठिकाणी आपणास सुचना देत आहे उपायुक्त साहेब की याची माहिती घ्या आपण आणि जेव्हा पासुन वापर होत आहे तेव्हापासुन ८१ के ची वसुली करा.मनपाची जबाबदारी काय आहे की मनपाची मालमत्ता कराची आकारणी लावणे , या सगळया गोष्टीं आपण करायच्या असतात. तर त्याकडे आपल किती दुर्लक्ष होत आहे. सोनवणे साहेब या गोष्टी आपण लक्षात आणुन द्यायला पाहिजे होत्या. आपल्याला अडचणी आहे का यामध्ये ?

**श्री.व्ही.ओ.सोनवणी :-** आता माझे कर्मचाऱ्यांच्या बदल्या झाल्या. नविन कर्मचारी आल्यानंतर बघुन घ्यावे लागेल.

**मा.उपायुक्त (महसुल) :-** इतके दिवसापासुन काय केल आजचा विषय आहे का हा ?

**श्री.व्ही.ओ.सोनवणी :-** आकारणी तर चालु आहे ना.

**मा.सभापती :-** म्हणजे फक्त टॅक्स आकारणी करतो आपण. त्यांच्याकडे माणसं नाही असे त्यांचे म्हणणे आहे.

**मा.उपायुक्त (महसुल) :-** त्यांच्याकडेच आहे सर्व माणसं, त्यांनी एकपण सोडलेल नाही.

**मा.सभापती :-** माझी प्रशासनाला विनंती आहे की, त्यांच्याकडे माणसं असु द्यावे. कारण मालमत्ता वाढविण्यासाठीच ते डिपार्टमेंट आहे. त्यांचे जर ऑपरेटर काढुन घेतले तर त्यांना काम करण्यात अडचण येणार आहे. नविन माणसाला पुन्हा ते सर्व फॉरमेट शिकविणेसाठी वेळ लागेल. तेव्हा काम बंद पडणार नाही याची काळजी घ्यावी.

**श्री.सुनिल खडके :-** आपण ज्या संस्थेला जागा दिली आहे. जागृती महिला मंडळाला, त्यांना असे भाडयाने देता येते का दुसऱ्यांना, तर मला अस विचारायच आहे. आपण ती जागा ओपनस्पेस त्यांना दिली जागृती महिला मंडळाला, त्यांना दिल्यानंतर त्यांना दुसऱ्याला भाडयाने देता येते का ? ती जागा आपली मनपाची आहे ती ताब्यात घ्या.

**मा.उपायुक्त (महसुल) :-** हा घेण्यात येईल . त्याच्या नोटीसही झाल्या आहेत टाऊन प्लॉनिंग कडुन की ताब्यात घेण्याच्या ती घेण्यात येईल.

**मा.सभापती :-** शेख साहेब हि नोटीस कधी झालेली आहे ८१ ब ची आपण दिली आहे.

**श्री.ईस्माईल शेख(टी.पी.):-** २००६ साली देण्यात आलेली आहे

**मा.सभापती :-** २००६ साली ८१ ब ची नोटीस देण्यात आलेली आहे. आणि आता २०१९ म्हणजे किती उशीर .

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** ती कोणाला दिली आहे.

**मा.सभापती :-** जागृती महिला मंडळाला देण्यात आलेली आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** जागृती महिला मंडळाला दिली आहे की बँकेला देवुन आले आहेत ती नोटीस.

**मा.सभापती** :- नोटीस आपण जागेवर डकवली होती का?

**श्री.ईस्माईल शेख(टी.पी.) :-** हो मॅडम.

**मा.सभापती** :- जागेवर डकवता आहे ते, जर ते मंडळ अस्तित्वात नाही. त्याचा कोणताही पाठपुरावा होत नाही. ती नोटीस जर जागेवर ठेवली तर आपण बजावुन दिली त्याचा असा अर्थ असतो.

**श्री.दिलीप पोकळे** :- आता विषय निघालेला आहे तर पुढच्या स्थायीच्या मिटींगला महापालिकेच्या जे जागा संस्थेला दिलेल्या आहे आणि त्या संस्थेने दुसऱ्याला भाडयाने दिलेल्या आहे त्या सर्वांची आपण यादी तयार करुन घ्या. पुढच्या मिटींगला ही माहिती सदस्यांना सभागृहाला अवगत करावी.

**मा.सभापती** :- जिथे जिथे बेकायदेशीर रित्यांने पोट भाडेकरु आहे. त्या जागांची माहिती सभागृहाला अवगत करावे.

**श्री.सदाशिव ढेकळे** :- दुसरा एक ओपनस्पेसच्या संदर्भातला विषय आहे. जे लेआऊट धारक आहे. अजुन त्या ओपनस्पेस त्यांच्याच नावाने आहे. आता माझ्या प्रभागामध्ये तारेच कुंपन करण्याचा आम्ही एक इस्टीमेट बनविल आणि ते परत आल. परत येण्याच कारण आहे कलेक्टर ऑफिस मधुन ते काम आपण १०० कोटीत सांगितल होत. तर ती जागा लेआऊट धारकाच्या नावावर आहे आजही. त्याच्यासाठी पाठपुरावा चालु आहे. मी बोललो ही होतो आर.डी.पाटीलला त्याच्यासाठी काय करता येईल. आपल्या ओपनस्पेस आपल्या नावावर करता येईल यासाठी काय करता येईल. लेआऊट धारकांच्या नावावर आतापर्यंत आहे. त्यांनी अजुन ही प्रोसिजर पुर्ण केली नाही.

**मा.सभापती** :- शेख साहेब, आप इसके बारे मे कुछ जानकारी दे सकते है.

**श्री.सदाशिव ढेकळे** :- धामणे साहेब देतील याची माहिती.

**श्री.ईस्माईल शेख(टी.पी.) :-** लेआऊट मंजुर करतांना ते लॅण्डमार्क असतो त्याचं ताबा आपण घेऊन घेतो. ढेकळेदादा जे म्हणत आहे असे जी जागा आहे असे जागांना आपण नांव लावुन घेऊ शकता. असे काही ३-४ जागा आपण नांवावर लावुन घेत आहे.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** कसे करता येईल ते आपल्या नावावर.

**श्री.ईस्माईल शेख(टी.पी.) :-** पत्र देऊन सोप्या पध्दतीने ते होऊन जात.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** किती दिवस लागतील याला. मागच्या बॉडीला मी विचारले होते. आताही विचारत आहे. आता तर हे माझ्या प्रभागातलं आहे. कुंपनाची तेथे तरतुद केलेली आहे. परंतु त्याचे कारण आहे की जागा महानगरपालिकेचे नावावर नाही. तर मी त्यांना पाठपुरावा करत आहे. आर.डी.पाटील त्या भागाचे आहे. काय कस करता येईल फक्त पत्र द्यायचे का ?

**श्री.ईस्माईल शेख(टी.पी.) :-** तहसीलदाराला पत्र देऊन होऊन जाईल.

**मा.सभापती** :- आजच्या मिटींग मध्ये ज्या ज्या विषयांची चर्चा झालेली आहे विभाग प्रमुखांनी याची नोंद घ्यायची आहे आणि पुढच्या सभेला प्रत्येक नगरसेवकाच्या समस्याला आपण काय तोडगा काढला हे सभेपुढे सादर करायचे आहे.

**श्री.चेतन सनकत :-** आरोग्य समितीच्या मिटींग मध्ये मी काही दोन तीन विषयांवर लक्ष टाकले होते प्रशासनाचे त्या विषयी मला डॉ.विकास पाटीलांशी काही विचारणा करायची आहे. आता आपण आरोग्य समिती नेमली. समितीच्या बैठकीत नागरीकांना दंड लावणे संदर्भात सुचना केली. तेव्हा मी तुम्हाला बोललो जसा नवनाथ भाऊ बोलले, सुनिलभाऊ बोलले. डासांचे निर्णय लावणे संदर्भात. मागेही तुम्हाला बोललो होतो. जीतपर्यंत महानगरपालिका पुर्ण आपल काम सक्षमपणे करत नाही. तोपर्यंत नागरीकांना दंड लावु नका. मी बोललो होतो की हे इतिवृत्तामध्ये यायला पाहिजे. हे रेकॉर्ड करा सगळ.

**आरोग्याधिकारी** :- इतिवृत्तात आहे.

**श्री.चेतन सनकत :-** एका ठिकाणी उपमहापौरांचे सांगीतल्या नंतर ही पेमेंट काढले, आरोग्य समिती सभापती समितीची बैठक घेऊन सुध्दा सांगत आहे की अस करु नका. काही ठिकाणी वाहन पोहचत नाही. काही ठिकाणी लोटगाडया मक्तेदार पुरवत नाही. म्हणुन लोकं कचरा उघडयावर टाकत आहे. त्यांना पर्यायी नाही म्हणुन ते टाकणारच आहे.तुम्ही ही व्यवस्था करणे ऐवजी अजुन दंडाचा भर का टाकता आहे. तुमच्यावर कोणाचा प्रेशर होत का ?

**आरोग्याधिकारी :-** ज्या ठिकाणी घंटागाडी गेली ते लोकंही उघडयावर कचरा टाकत आहे. आणि त्यांनी कबुल ही केल की चुक झाली. मी त्यांना विचारले की घंटागाडी आली होती का ? त्यांनी हो सांगितले तरी ही आम्ही कचरा टाकला.

**श्री.चेतन सनकत :-** एक आरोग्य समिती सभापती म्हणुन मी समितीच्या बैठकी मध्ये त्यांना काय काय मुद्दे लक्षात आणुन दिलेले आहे. त्याच्यामध्ये आता पर्यंत काही अंमलबजावणी नाही. काही सुधारणा नाही. हे कुठपर्यंत चालेल. अस असेल तर तुम्ही सांगुन द्या मला आपण आरोग्य समिती कॅन्सल करुन टाकु मी महापौरांना सांगतो. आरोग्य समिती जर तुम्हाला चालत नसेल तर तसा मी मॅडमांना, महापौर मॅडमांना सांगतो की, ही समिती रद्द करा. यांच्या हिशोबाने काम चालु द्या. मी आरोग्य समिती सभापती पदावरुन राजीनामा देऊन देतो. मी जे सांगितले त्याची अंमलबजावणी केली का? तुम्ही संपुर्ण लेखी पॉईन्टस माझ्यापर्यंत पोहचविले का?

**आरोग्याधिकारी :-** नाही.

**श्री.चेतन सनकत :-** मी पुढच्या सभेमध्ये हा प्रश्न विचारणार.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** एक महत्वाचा विषय असा आहे की, मानधन जे आहे आताच नाही मागच. १० वर्षापुर्वीच ८ वर्षापुर्वीच जे रोखले आहे ते मिळाव असे जेवळे नगरसेवक आहे. त्यांच्या अपेक्षा आहे. मागे परिस्थिती बरी नव्हती म्हणुन आम्हीपण म्हणत नव्हतो की जाऊ द्या. आता नविन कॅफो साहेब आलेले आहे आणि त्यांच्याशी अपेक्षा आहे. होत असेल तर आम्हाला उत्तर सांगा बर होईल.

**मुख्यलेखाधिकारी :-** आम्ही जे महानगरपालिकेचे दायीत्व आहे दायीत्वावर सर्व याद्या तयार केलेल्या आहे. दायीत्व संपल्यावर आयुक्त साहेबांशी चर्चा करुन याची माहिती देतो.

**श्री.सुनिल खडके :-** सर काही लोकांचे सन २००३-०४ चे बाकी आहे. काही लोकांची परिस्थिती इतकी खराब आहे जे माजी नगरसेवक आहे. काही आजारी पडलेले आहे. कोणाला काय प्रॉब्लम आहे. असे मला बरेच जण बोलतात की, आता तुम्ही स्थायी मध्ये आहे तुम्ही मागणी करा. सन २००३-०४ चे बाकी आहे. सर्वात पहिली टर्म होती ती.

**मुख्यलेखाधिकारी :-** रितसर याद्या तयार झाल्या. आयुक्तांशी चर्चा करु आणि तुम्हाला पुढच्या मिटींगला सांगु.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** माझी नववी टर्म आहे आणि मागील खुप वर्षांची राहीली आहे. आता काही जमा झालेले मागच्या महिन्याच ही बाकी आहे.

**मा.सभापती :-** पुढच्या मिटींगला सांगतील ते.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. १८२ पारित करण्यात आला.**

**असा ठराव करणेत येत आहे की,** स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) सन २०१९-२० अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत वार्ड क्रं.१४ तांबापुरा खदानिजवळ ६० सिटस सार्व.शौचालय बांधणे कामास महासभा ठराव क्रं.१६३ दि.०६/०६/२०१९ अन्वये उक्त निधी अंतर्गत करण्यास मान्यता देवून आयुक्त मनपा यांनी प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. त्यानुसार आयुक्त यांचे मान्यते अन्वये उक्त कामाची ई-निविदा सुचना क्रं.१३८० सन २०१९-२० मनपा च्या संकेत स्थळ WWW.JCMC.gov.in वर प्रसिध्द करण्यात आली अशी ई निविदा सुचना दै.दिव्यमराठी या वर्तमान पत्रात दि.२३/०७/२०१९ रोजी प्रसिध्द केल्यानुसार दिलेल्या मुदतीत ०३ ई-निविदा प्राप्त झालेल्या असुन मक्तेदार यांनी दिलेल्या ई-निविदा दरांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे,

| अ.क्र. | निविदा धारकाचे नांव | निविदा रक्कम रु.५३,०७,५७०/- | अपेक्षीत खर्च |
|---|---|---|---|
| १ | राजकिरण नरेंद्र चौधरी | निविदा रक्कमेवर १% जास्तीचे दराने | ५३,६०,६४६/- |
| २ | प्रविण काशिनाथ राणे | निविदा रक्कमेवर ०.१०% कमीचे दराने | ५३,०२,२६२/- |
| ३ | स्वामी कंन्स्ट्रक्शन | निविदा रक्कमेवर २% जास्तीचे दराने | ५४,१३,७२१/- |

तुलनात्मक तक्ता पाहता मक्तेदार प्रविण काशिनाथ राणे यांचे दर इतर मक्तेदारापेक्षा कामाचे निविदा रक्कमेपेक्षा ०.१०% सर्वात कमी आलेले दरानुसार सदर कामी येणाऱ्या रक्कम रु.५३,०२,२६२/- मात्र चे खर्चास महाराष्ट्र महापालिका अधिनियमाचे प्रकरण ७ कलम ७३ (क) नुसार मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

तसेच उक्त कामी येणारा खर्च रक्कम रु.५३,०२,२६२/- पैकी रक्कम रु.३९,२०,०४०/- मात्र स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) सन २०१९-२० अंतर्गत केंद्र व राज्य शासन यांच्या निधितुन व उर्वरीत रक्कम रु.१३,८२,२२२/- मात्र मनपा निधीतून करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने नियमानुसार शासन आदेश/निर्देशानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :-** १३ **प्रतिकुल मते :-** ००

**सुचक :-** **ढेकळे सदाशिव गणपत**

**अनुमोदक :-** **पाटील राजेंद्र झिपरु**

**मा.सभापती:-** सभा संपलेली असल्याने नगरसचिव यांनी राष्ट्रगीत सुरु करावे.
राष्ट्रगीत झाल्यानंतर सभा संपन्न झाली.

**सही/-**

**सभापती**

**स्थायी समिती**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**